राज्यसेवा (मुख्य) परीक्षा : सामान्य अध्ययन पेपर (२)

## भारतीय संविधान, राजकारण (महाराष्ट्राच्या विशेष संदर्भासह) व कायदा

# तयारी आणि मार्गदर्शन

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने , राज्यसेवा मुख्य परीक्षेतील सामान्य अध्यन पेपर (२) च्या अभ्यासक्रमात पुढील ६ प्रकरणे नमूद केलेली आहेत –

# (३) लोकप्रशासन, भारतीय प्रशासन व सार्वजनिक सेवा

१) लोकप्रशासनातील संकल्पना, दृष्टिकोन आणि सिद्धांत
२) भारतीय प्रशासनाचा उगम
३) सार्वजनिक सेवा
४) वित्तीय प्रशासन
५) राज्य प्रशासन (महाराष्ट्राचा विशेष संदर्भ)
६) जिल्हा प्रशासन

## १) लोकप्रशासनातील संकल्पना, दृष्टिकोन आणि सिद्धांत

**१) संकल्पना –**

१) नवीन सार्वजनिक व्यवस्थापन
२) नागरी संस्था
३) विकेंद्रीकरण व प्रदत्तीकरण
४) ई–गव्हर्नन्स

**२) दृष्टिकोन –**

१) वर्तणुकात्मक दृष्टिकोन
२) व्यवस्था दृष्टिकोन

**३) सिद्धांत –**

१) नोकरशाही सिद्धांत
२) मानवी संबंध सिद्धांत

### २) भारतीय प्रशासनाचा उगम

१) ब्रिटिशपूर्व काळ
२) ब्रिटिश काळ
३) स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचा काळ

## ३) सार्वजनिक सेवा

१) **सार्वजनिक सेवा –**

१) अखिल भारतीय सेवा – सांविधानिक दर्जा व कार्ये.

१) केंद्रीय सेवा – सांविधानिक दर्जा व कार्ये.

१) राज्य सेवा – सांविधानिक दर्जा व कार्ये.

**२) भरती आणि प्रशिक्षण –**

भरती व प्रशिक्षणाचे प्रकार

**३) प्रशिक्षण संस्था –**

१) लालबहादूर शास्त्री प्रशासन अकादमी,

२) सरदार वल्लभभाई पटेल राष्ट्रीय पोलीस अकादमी,

३) यशवंतराव चव्हाण विकास प्रकाशन प्रबोधिनी (यशदा)

४) भारतीय लोकप्रशासन संस्था (आयआयपीए)

**४) केंद्रीय सचिवालय –**

१) पंतप्रधान कार्यालय – अधिकार, कामे आणि भूमिका

२) मंत्रिमंडळ सचिव – अधिकार, कामे आणि भूमिका

## ४) वित्तीय प्रशासन : अभ्यासक्रमात नमूद विषय व उपविषय

**१) अर्थसंकल्पीय प्रक्रिया –**अर्थसंकल्प तयार करणे, कायदेशीर प्रक्रिया आणि अंमलबजावणी करणे.

**२) सार्वजनिक खर्चावरील नियंत्रण –**

१) संसदीय नियंत्रण

२) वित्त मंत्रालयाचे नियंत्रण

**३)समित्यांद्वारे नियंत्रण –**

१) लोकलेखा समिती (पीएसी)

२) अंदाज समिती

३) सार्वजनिक उपक्रम समिती

**३) भारताचे नियंत्रक व महालेखा परीक्षक – कार्ये व भूमिका**

*** अर्थव्यवस्था व महालेखापाल महाराष्ट्र**

## ५) राज्य प्रशासन : अभ्यासक्रमात नमूद विषय व उपविषय

* राज्य सचिवालय मुख्य सचिव – कार्य व भूमिका

१) राज्य सचिवालय, मंत्रालय

२) मुख्य सचिव व इतर प्रमुख अधिकारी

३) राज्य संचालनालय

## ६) जिल्हा प्रशासन

१) जिल्हा प्रशासनाचा उगम व विकास

२) जिल्हा अधिकारी – अधिकार व कार्ये, जिल्हा अधिकाऱ्याची बदलती भूमिका

३) उपविभागीय अधिकारी, तहसीलदार आणि तलाठी – कार्ये व भूमिका

४) कायदा व सुव्यवस्था – यंत्रणा, जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक आणि नागरिक

## ७) ग्रामीण स्थानिक प्रशासन

* स्थानिक शासनाची वैशिष्ट्ये

१) ग्रामसभा व ग्राम पंचायत – रचना, अधिकार व कार्ये

२) पंचायत समिती – रचना, अधिकार व कार्ये

३) जिल्हा परिषद – रचना, अधिकार व कार्ये

४) मुख्य कार्यकारी अधिकारी, गटविकास अधिकारी आणि ग्रामसेवक – कार्य व भूमिका

५) ग्रामीण विकास आणि पंचायती राज

## ८) नागरी स्थानिक शासन व प्रशासन

१) नगर पंचायत – रचना, अधिकार व कार्ये

२) नगरपरिषद – रचना, अधिकार व कार्ये

३) महानगरपालिका – रचना, अधिकार व कार्ये

४) कटक मंडळ – रचना, अधिकार व कार्ये

५) मुख्य अधिकारी आणि महानगरपालिका आयुक्त – कार्ये व भूमिका

६) नागरी विकास व नागरी स्थानिक संस्था

# लोकप्रशासन, भारतीय प्रशासन व सार्वजनिक सेवा विषयावरील राज्यसेवा मुख्यपरीक्षेतील प्रश्न : २०१२ ते २०१९

## सामान्य अध्ययन पेपर (२) विषय – ३ : लोकप्रशासन, प्रशासन व सार्वजनिक सेवा

### लोकप्रशासन, प्रशासन व सार्वजनिक सेवा : घटक आणि उपघटकावरील प्रश्नसंख्या

| | *घटक –उपघटक/ प्रश्न व गुणसंख्या* | *२०१२* | *२०१३* | *२०१४* | *२०१५* | *२०१६* | *२०१७* | *२०१८* | *२०१९* |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **उपविषय – १) लोकप्रशासनातील संकल्पना, दृष्टिकोन आणि सिद्धांत** | | | | | | | | |
| १) | संकल्पना | | | | | | | | |
| २) | दृष्टिकोन | | | | | | | | |
| ३) | सिद्धांत | | | | | | | | |
| | **उपविषय – २) भारतीय प्रशासनाचा उगम** | | | | | | | | |
| १) | ब्रिटिशपूर्व काळ | | | | | | | | |
| २) | ब्रिटिश काळ | | | | | | | | |
| ३) | स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचा काळ | | | | | | | | |
| | **उपविषय – ३) सार्वजनिक सेवा** | | | | | | | | |
| १) | अखिल भारतीय सेवा | २ | ४ | ६ | ७ | ४ | ३ | ५ | २ |
| २) | केंद्रीय व राज्य सेवा | – | – | – | – | २ | – | – | १ |
| ३) | भरती आणि प्रशिक्षण | ५ | ३ | ५ | ४ | ३ | ४ | २ | १ |
| ४) | प्रशिक्षण संस्था | – | – | – | – | १ | – | – | १ |
| ५) | केंद्रीय सचिवालय | – | – | – | – | १ | १ | – | – |
| | *एकूण* | *७* | *७* | *११* | *११* | *११* | *८* | *७* | *५* |
| | **उपविषय – ४) वित्तीय प्रशासन** | | | | | | | | |
| १) | अर्थसंकल्पीय प्रक्रिया | – | – | १ | – | – | १ | – | १ |
| २) | वित्त मंत्रालयाचे नियंत्रण | ३ | ३ | – | २ | २ | २ | ३ | १ |
| ३) | संसदीय नियंत्रण | ७ | १ | ३ | २ | ३ | २ | ३ | १ |
| ४) | लोकलेखा समिती (पीएसी) | – | – | २ | १ | – | १ | – | १ |
| ५) | अंदाज समिती | – | १ | – | १ | – | – | १ | १ |
| ६) | सार्वजनिक उपक्रम समिती | – | – | १ | – | – | – | २ | – |
| ७) | भारताचे नियंत्रक व महालेखा परीक्षक | २ | २ | २ | ४ | – | २ | – | २ |
| * | अर्थव्यवस्था व महालेखापाल महाराष्ट्र | – | ४ | १ | – | ४ | २ | २ | – |
| | *एकूण* | *१२* | *११* | *१०* | *१०* | *९* | *१०* | *११* | *७* |
| | **उपविषय – ५) राज्य सरकार व प्रशासन** | | | | | | | | |
| १) | राज्य सचिवालय, मंत्रालय | – | – | १ | २ | ३ | १ | ३ | – |
| २) | मुख्य सचिव व इतर अधिकारी | १ | – | – | – | १ | १ | – | १ |
| ३) | राज्य संचालनालय | १ | – | – | – | १ | १ | – | १ |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | *एकूण* | *२* | *–* | *१* | *२* | *५* | *३* | *३* | *२* |

## उपविषय – ६) जिल्हा प्रशासन

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | जिल्हा प्रशासनाचा उगम व विकास | – | १ | – | १ | १ | – | – | २ |
| २) | जिल्हा अधिकारी | १ | १ | १ | २ | १ | २ | ३ | २ |
| ३) | उपविभागीय अधिकारी, तहसीलदार आणि तलाठी | – | – | – | १ | – | १ | १ | १ |
| ४) | कायदा व सुव्यवस्था यंत्रणा | – | – | – | १ | १ | – | – | – |
| | *एकूण* | *१* | *२* | *१* | *५* | *३* | *३* | *४* | *५* |

## उपविषय – ७) ग्रामीण स्थानिक प्रशासन

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| * | स्थानिक शासनाची वैशिष्ट्ये | १ | – | २ | – | १ | – | १ | २ |
| १) | ग्रामसभा व ग्राम पंचायत | – | २ | २ | २ | २ | २ | २ | ३ |
| २) | पंचायत समिती | – | १ | १ | – | – | १ | २ | ३ |
| ३) | जिल्हा परिषद | १ | २ | १ | ३ | १ | ३ | १ | – |
| ४) | सीईओ, गटविकास अधिकारी व ग्रामसेवक | – | १ | – | – | २ | – | १ | – |
| ५) | ग्रामीण विकास आणि पंचायती राज | १ | – | १ | – | – | १ | – | – |
| | *एकूण* | *३* | *६* | *७* | *५* | *६* | *७* | *७* | *८* |

## उपविषय – ८) नागरी स्थानिक प्रशासन

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | नगर पंचायत – रचना, अधिकार व कार्ये | – | – | – | – | – | – | – | १ |
| २) | नगरपरिषद – रचना, अधिकार व कार्ये | १ | २ | – | २ | – | – | १ | २ |
| ३) | महानगरपालिका – रचना, अधिकार व कार्ये | ३ | २ | २ | २ | १ | २ | १ | २ |
| ४) | कटक मंडळ – रचना, अधिकार व कार्ये | १ | – | – | १ | – | – | – | १ |
| ५) | मुख्य अधिकारी आणि महानगरपालिका आयुक्त | १ | १ | – | – | – | – | १ | – |
| ६) | नागरी विकास व नागरी स्थानिक संस्था | १ | – | – | १ | – | – | – | १ |
| | *एकूण* | *७* | *५* | *२* | *६* | *१* | *२* | *३* | *७* |
| | ***एकूण*** | ***३१*** | ***३१*** | ***३२*** | ***३९*** | ***३५*** | ***३३*** | ***३५*** | ***३४*** |

# (१) लोकप्रशासनातील संकल्पना, दृष्टिकोन आणि सिद्धांत

## १) लोकप्रशासनातील संकल्पना, दृष्टिकोन आणि सिद्धांत

**१) संकल्पना –**

१) नवीन सार्वजनिक व्यवस्थापन
२) नागरी संस्था
३) विकेंद्रीकरण व प्रदत्तीकरण
४) ई–गव्हर्नन्स

**२) दृष्टिकोन –**

१) वर्तणुकात्मक दृष्टिकोन
२) व्यवस्था दृष्टिकोन

**३) सिद्धांत –**

१) नोकरशाही सिद्धांत
२) मानवी संबंध सिद्धांत

# (२) भारतीय प्रशासनाचा उगम

१) ब्रिटिशपूर्व काळ
२) ब्रिटिश काळ
३) स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचा काळ

# (३) सार्वजनिक सेवा

## सार्वजनिक सेवा : अभ्यासक्रमात नमूद विषय व उपविषय

**१) सार्वजनिक सेवा**
**२) भरती आणि प्रशिक्षण**
**३) प्रशिक्षण संस्था**
**४) केंद्रीय सचिवालय**

१) **सार्वजनिक सेवा** –
१) अखिल भारतीय सेवा – सांविधानिक दर्जा व कार्ये.
१) केंद्रीय सेवा – सांविधानिक दर्जा व कार्ये.
१) राज्य सेवा – सांविधानिक दर्जा व कार्ये.

**२) भरती आणि प्रशिक्षण –**
भरती व प्रशिक्षणाचे प्रकार

**३) प्रशिक्षण संस्था –**
१) लालबहादूर शास्त्री प्रशासन अकादमी,
२) सरदार वल्लभभाई पटेल राष्ट्रीय पोलीस अकादमी,
३) यशवंतराव चव्हाण विकास प्रकाशन प्रबोधिनी (यशदा)
४) भारतीय लोकप्रशासन संस्था (आयआयपीए)

**४) केंद्रीय सचिवालय –**
१) पंतप्रधान कार्यालय – अधिकार, कामे आणि भूमिका
२) मंत्रिमंडळ सचिव – अधिकार, कामे आणि भूमिका

'नोकरशाही' ही देशाच्या विकासाची व आधुनिकीकरणाची वाहक असते. देशाच्या आधुनिकीकरणात तिची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. प्रशासनाची धुरा सांभाळणाऱ्या लोकसेवकाला पुढील ३ कार्ये करावी लागतात –

१) शासनाच्या धोरणामध्ये सातत्य राखणे.
२) कायद्याची व धोरणांची अंमलबजावणी करणे.
३) धोरण निर्मितीसाठी, धोरण निर्मात्यांना माहिती पुरविणे वा सल्ला देणे.

स्पर्धा परीक्षा देऊन प्रशासनात करिअर करणारा उमेदवार, ही कार्ये पार पाडण्यास सक्षम आहे की नाही हे तपासण्यासाठी प्रशासकीय यंत्रणेबाबत प्रश्न विचारले जातात. भारतातील लोकसेवेला ब्रिटिश वसाहतीकाळा पासूनचा संदर्भ आहे. त्यामुळे लोकसेवेबाबत विविध घटनात्मक आयोगांचा, तरतुदींचा अभ्यास करताना तिची ऐतिहासिक पाळेमुळे

व सद्य:स्थिती अभ्यासावी. अखिल भारतीय सेवा, केंद्रीय लोकसेवा आयोगाप्रमाणेच महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाबाबतची माहिती महत्त्वाची आहे.

भारताचे ऐक्य व अखंडता राखण्यातील तिचे स्थान विचारात घेऊन घटनाकारांनी या यंत्रणेला स्थायित्व प्रदान करण्यासाठी राज्यघटनेत केलेली तरतूद म्हणजे लोकसेवा आयोगाची घटनात्मक तरतूद होय.

सेवक प्रशासनाचा भाग म्हणून या लोकसेवकांची भरती, बढती व प्रशिक्षण व त्यांना प्रशिक्षण देणाऱ्या राष्ट्रीय व राज्यपातळीवरील संस्थांचा अभ्यास करावा.

इंग्रजीतून माहेश्वरी, अरोरा, लक्ष्मीकांत, फादिया, इंडिया इयर बुक अशा संदर्भग्रंथासह मराठीतील महाराष्ट्र आर्थिक पाहणी अहवाल, स्टडी सर्कलची पुस्तके यांचा आधार घ्यावा.

लोकसेवांद्वारे नोकरशाहीचे अस्तित्व व सातत्य टिकविले जाते. एका अर्थाने, नोकरशाहीच्या पोलादी चौकटीचा आधार लोकसेवा असते. भारतीय घटनाकारांनी राज्यघटनेतील १४ व्या भागामध्ये कलम ३०८ ते ३१४ अंतर्गत लोकसेवेसंबंधी तरतुदी केलेल्या आहेत.

लोकसेवांचा अभ्यास करताना पुढील मुद्दे महत्त्वाचे ठरतात–स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळातील लोकसेवेला आकार देणारे विविध आयोग व समित्यांच्या शिफारशी, स्वातंत्र्योत्तर भारतात लोकसेवांचे केलेले समर्थन, राज्यघटनेतील तरतुदी, लोकसेवांचे विविध प्रकार–अखिल भारतीय सेवा, केंद्रीय सेवा व राज्यसेवा, या प्रत्येक प्रकारातील विविध सेवांचे प्रकार, त्यांची निर्मिती, त्याबाबतचे केंद्र सरकार वा संसदेचे अधिकार, या विभिन्न सेवांबाबत विविध आयोग/समित्यांनी केलेल्या शिफारशी, या सेवांच्या सेवाशर्ती व त्यातील पदांचे वर्गीकरण.

या सेवांच्या भरतीसाठी परीक्षेचे विविध टप्पे पूर्ण करणाऱ्या लोकसेवा आयोगांचा – केंद्र व महाराष्ट्र लोकसेवा आयोगांचा अभ्यास करताना पुढील घटकावर भर द्यावा– घटनात्मक तरतूद, त्यांची नामाभिधाने, रचना, अध्यक्ष व सदस्यांची निवड, कार्यकाळ, बडतर्फी, अधिकार व कार्ये, आयोगाचे स्वातंत्र्य, पदस्थांची नावे.

प्रशासनाची अभिमुखता, कार्यक्षमता व व्यवहार यांना कालसुसंगत बनविण्यासाठी किंवा नागरिककेंद्री प्रशासन, माहिती अधिकार, मानवी हक्क व सुशासन या संकल्पनांच्या प्रभावातून प्रशासनाची उपयुक्तता व गुणवत्ता वाढविण्यासाठी प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षणावर भर दिला जातो. ही महत्त्वपूर्ण जबाबदारी पार पाडणारी महाराष्ट्र राज्यातील *'यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा)'* आणि *'राष्ट्रीय स्तरावरील लालबहादूर शास्त्री प्रशासन अकादमी'* व *'सरदार वल्लभभाई पटेल राष्ट्रीय पोलीस अकादमी'* या संस्थांची स्थापना, ठिकाणे, लघुरूप, त्यांची उद्दिष्टे, त्या प्रशिक्षण देत असलेल्या प्रमुख सेवा, प्रशिक्षण कालावधी, प्रशिक्षणाचे स्वरूप, त्यातील अभ्यासक्रम, या संस्थांची वैशिष्ट्ये, या संस्थांचे नावीन्यपूर्ण उपक्रम, त्यांचे संचालक आणि या संस्थांचा करण्यात आलेला गौरव वा मिळालेले पुरस्कार इत्यादी विविध घटकांची माहिती ज्ञात असावी. या प्रमुख प्रशिक्षण संस्थांबरोबर अन्य प्रशिक्षण संस्थांचीही थोडक्यात माहिती असावी.

## ३) सार्वजनिक सेवा : घटक आणि उपघटकावरील प्रश्नसंख्या

| | *घटक –उपघटक/ प्रश्न व गुणसंख्या* | *२०१२* | *२०१३* | *२०१४* | *२०१५* | *२०१६* | *२०१७* | *२०१८* | *२०१९* |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | अखिल भारतीय सेवा | २ | ४ | ६ | ७ | ४ | ३ | ५ | २ |
| २) | केंद्रीय व राज्य सेवा | – | – | – | – | २ | – | – | १ |
| ३) | भरती आणि प्रशिक्षण | ५ | ३ | ५ | ४ | ३ | ४ | २ | १ |
| ४) | प्रशिक्षण संस्था | – | – | – | – | १ | – | – | १ |
| ५) | केंद्रीय सचिवालय | – | – | – | – | १ | १ | – | – |
| | *एकूण* | *७* | *७* | *११* | *११* | *११* | *८* | *७* | *५* |

# १) सार्वजनिक सेवा

## १) अखिल भारतीय सेवा – सांविधानिक दर्जा व कार्ये

१) सेवांच्या निर्मितीबाबत जोड्या लावा.

| *सेवा* | *वर्ष* |
|---|---|
| a) भारतीय अभियांत्रिकी सेवा | i) १९०७ |
| b) भारतीय वैद्यकीय सेवा | ii) १९०६ |
| c) भारतीय शिक्षण सेवा | iii) १८९७ |
| d) भारतीय कृषी सेवा | iv) १८९२ |

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| १) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| २) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| ३) | (iv) | (i) | (iii) | (ii) |
| ४) | (i) | (ii) | (iv) | (iii) |

२) भारतीय वनसेवेची निर्मिती कधी करण्यात आली?

१) १ एप्रिल १९४७ २) १ जुलै १९५१ ३) १ जून १९६१ ४) १ जुलै १९६६

३) खालील कोण 'अखिल भारतीय सेवांचे जनक' म्हणून ओळखले जातात?

१) डॉ. बी. आर. आंबेडकर २) वल्लभभाई पटेल ३) जवाहरलाल नेहरू ४) डॉ. राजेंद्र प्रसाद

४) खालीलपैकी कोण सनदी सेवेस प्रबळ व चिरस्थायी आधार देण्यासाठी घटनात्मक तरतूद करण्यास आग्रही होते?

१) लॉर्ड मेकाले २) डॉ. बी. आर. आंबेडकर ३) सरदार पटेल ४) लॉर्ड कॉर्नवालीस

५) खालील विधाने विचारात घ्या :

a) 'नागरी सेवा' (Civil Service) हा शब्दप्रयोग सर्वप्रथम ईस्ट इंडिया कंपनीच्या नोकरवर्गासाठी वापरला गेला.

b) आय सी एस (ICS) चे ब्रिटिशांची नागरी सेना असेही वर्णन केले गेले.

c) अनुच्छेद ३०९ सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयांच्या नोकर वर्गास लागू होत नाही.

वरीलपैकी कोणती विधाने **बरोबर** आहेत?

१) (a), (b) २) (b), (c) ३) (a), (c) ४) वरील सर्व

६) भारतीय अभियांत्रिकी सेवेची शिफारस ........ केली होती.

१) प्रथम केंद्रीय वेतन आयोगाने २) दुसऱ्या केंद्रीय वेतन आयोगाने

३) पाचव्या केंद्रीय वेतन आयोगाने ४) तिसऱ्या केंद्रीय वेतन आयोगाने

७) खालीलपैकी कोणती शिफारस ली आयोगाने (१९२३) केलेली नाही?

१) वैधानिक सनदी सेवा समाप्त केल्या २) सर्व सेवा वर्गीकृत करणे.

३) लोकसेवा आयोगाची स्थापना ४) उत्कृष्ट वेतन पॅकेज (प्रस्ताव)

८) **योग्य** विधान/विधाने निवडा.

a) सरदार वल्लभभाई पटेल यांना भारतातील नागरी सेवेचे जनक म्हणतात.

b) राज्य सेवेतील राजपत्रित वर्गातील सदस्यांची नावे भरती व निवृत्तीच्या वेळी सरकारी राजपत्रात प्रसिद्ध केली जातात.

c) अखिल भारतीय सेवेतील सदस्यांचे वेतन राज्य सरकार व निवृत्ती वेतन केंद्र सरकार देते.

**पर्यायी उत्तरे :**

१) विधान (a) आणि (c) बरोबर, (b) चूक.

२) विधान (c) बरोबर, (a) आणि (b) चूक.
३) विधान (b) बरोबर, आणि विधान (a), (c) चूक
४) वरील सर्व विधाने बरोबर

९) खालीलपैकी कोणते विधान **बरोबर नाही?**
१) १९५५ मध्ये राज्य पुनर्रचना आयोगाने भारतीय अभियंता सेवा, भारतीय वन सेवा आणि भारतीय वैद्यकीय आणि आरोग्य सेवा गठित करण्याची शिफारस केली होती.
२) राज्यसभेने ६ डिसेंबर १९६४ रोजी अखिल भारतीय अभियंता सेवा, भारतीय वन सेवा आणि भारतीय वैद्यकीय व आरोग्य सेवा निर्मितीसाठी ठराव मंजूर केला होता.
३) भारतीय वन सेवेची निर्मिती १९६६ मध्ये झाली.
४) पाचव्या केंद्रीय वेतन आयोगानेदेखील भारतीय वैद्यकीय व आरोग्य सेवा आणि भारतीय अभियंता सेवा या दोन अखिल भारतीय सेवांची निर्मिती करण्यासंबंधी शिफारस केली होती.

१०) पुढील दोनपैकी कोणते विधान **चुकीचे** आहे.
a) पाचव्या वेतन आयोगाने केवळ एक नवीन अखिल भारतीय सेवा सुचविली होती ती म्हणजे भारतीय वैद्यकीय सेवा.
b) आयोगाने असेही सुचविले की अखिल भारतीय सेवा अधिकाऱ्याला निलंबित करावयाचे अधिकार राज्याला असू नयेत.

**पर्यायी उत्तरे** :
१) केवळ (a) २) केवळ (b) ३) दोन्ही ४) एकही नाही

११) 'अखिल भारतीय सेवे'संबंधी खालील विधाने विचारात घ्या.
a) त्या ब्रिटिश राजवटीची निर्मिती आहे.
b) त्या केंद्र आणि राज्यांसाठी सामाईक असतात.
c) त्या केंद्र आणि राज्य शासनांना जोडणारा मौल्यवान दुवा उपलब्ध करतात.
d) त्या अखिल भारतीय स्तरावर समान शैक्षणिक पात्रता आणि एकाच वेतन श्रेणीने भरती केल्या जातात.

**पर्यायी उत्तरे** :
१) विधाने (a), (b), बरोबर आहेत २) विधाने (b), (c), (d) बरोबर आहेत
३) विधाने (b), (d) बरोबर आहेत ४) विधाने (a), (b), (c), (d) बरोबर आहेत

१२) नवीन अखिल भारतीय सेवांची निर्मिती ....... करू शकतात.
१) संसद ठराव करून २) संसद कायदा तयार करून
३) राष्ट्रपती आदेश पारित करून ४) केंद्रीय लोकसेवा आयोग ठराव करून

१३) अखिल भारतीय सेवांच्या निर्मिती बाबत खालील विधाने विचारात घ्या :
a) राज्यसभेने तिच्या एकूण सभासद संख्येच्या निम्म्यापेक्षा कमी नाही इतक्या सदस्यांच्या पाठिंब्याच्या ठरावाने तसे घोषित करावे लागते.
b) राज्यघटनेच्या अनुच्छेद – ३१२ अन्वये संसदेला कायद्याद्वारे संघराज्य आणि घटक राज्ये यांना सामाईक अशा एक किंवा अनेक अखिल भारतीय सेवा निर्माण करण्याचा अधिकार दिला आहे मात्र त्यासाठी अगोदर तसा ठराव राज्यसभेने मंजूर केला पाहिजे.

वरीलपैकी कोणते विधान/ने **बरोबर** आहे/त ?
१) फक्त (a) २) फक्त (b) ३) (a) आणि (b) दोन्हीही ४) (a) आणि (b) दोन्हीही नाही

१४) खालीलपैकी कोणते विधान **चुकीचे** आहे ?
१) अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्याविरुद्ध सक्तीची सेवानिवृत्ती, पदावरून दूर करणे (पदमुक्ती) आणि बडतर्फी (पदच्युती) अशी दंडात्मक कारवाई करण्याचा अधिकार केवळ केंद्र शासनाकडे आहे.

२) पदमुक्ती आणि पदच्युती मधील फरक म्हणजे पदमुक्ती मध्ये तो भविष्यात सरकारी नोकरीसाठी अपात्र ठरतो तर पदच्युती मध्ये तो भविष्यात सरकारी नोकरीसाठी अपात्र ठरत नाही.

३) अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्याची बदली आणि त्याचे निलंबन करण्याचा अधिकार राज्य शासनाला असतो.

४) वरीलपैकी एकही नाही.

१५) एखाद्या नवीन अखिल भारतीय सेवेची निर्मिती संसद केव्हा करू शकते ?

अ) लोकसभेने उपस्थित असणाऱ्या आणि मतदान करणाऱ्या २/३ सदस्यांच्या पाठिंब्याच्या ठरावा द्वारे ती सेवा आवश्यक आहे असे घोषित केल्यास.

ब) राज्यसभेने उपस्थित असणाऱ्या आणि मतदान करणाऱ्या २/३ सदस्यांच्या पाठिंब्याच्या ठरावा द्वारे ती राष्ट्रहितास आवश्यक आहे असे घोषित केल्यास.

क) किमान निम्म्या घटकराज्यांच्या विधानमंडळांच्या ठरावा द्वारे केंद्र सरकारला विनंती केल्यास.

ड) राष्ट्रपतीने ती सेवा राष्ट्रीय एकता व अखंडता यासाठी आवश्यक आहे असे घोषित केल्यास.

वरीलपैकी कोणते विधान बरोबर आहे ?

१) अ फक्त २) ब आणि क फक्त ३) ब फक्त ४) अ, ब आणि ड

१६) खालीलपैकी कोणत्या सेवांचा समावेश अखिल भारतीय सेवेत होतो ?

अ) भारतीय प्रशासकीय सेवा ब) भारतीय पोलीस सेवा

क) भारतीय विदेश सेवा ड) भारतीय वन सेवा

योग्य पर्याय निवडा :

१) अ आणि ब फक्त २) अ, ब आणि क फक्त ३) अ, ब आणि ड फक्त ४) अ, ब, क आणि ड

१७) खालील दोन विधानांपैकी कोणते योग्य आहे?

a) अनुच्छेद ३१२ अंतर्गत भारतीय संविधानाने अखिल भारतीय सेवांची तरतूद केलेली आहे.

b) भारतीय संविधानाचा भाग तेरावा ''संघ आणि राज्य अखत्यारीतील सेवा'' साठी आहे.

**पर्यायी उत्तरे :**

१) केवळ (a) २) केवळ (b) ३) दोन्ही ४) एकही नाही

१८) खालील विधाने विचारात घ्या.

a) अखिल भारतीय सेवेतील सदस्यांच्या सेवा शर्ती, भरतीचे नियम हे केवळ संसदेच्या कायद्याद्वारेच नियमित करता येतात.

b) अखिल भारतीय सेवा अधिनियम, १९५१ अनुसार अखिल भारतीय सेवेतील सदस्यांच्या भरतीचे नियम आणि सेवा शर्तीच्या नियमनासाठी राज्य सरकारांशी सल्लामसलत न करताही नियम बनविण्याचा अधिकार केंद्र शासनाला दिला गेला आहे.

c) अखिल भारतीय सेवेच्या अधिकाऱ्यांची नियुक्ती आणि नियंत्रण केंद्र शासनाद्वारे करण्यात येत असल्याने राज्यावर केंद्राचे नियंत्रण निर्माण करणारी अतिरिक्त एजन्सी म्हणून ही सेवा कार्य करते.

**पर्यायी उत्तरे :**

१) विधान (b), (c) बरोबर आहेत, (a) चूक आहे. २) विधान (a), (c) बरोबर आहेत, (b) चूक आहे.

३) विधान (a), (b) बरोबर आहेत, (c) चूक आहे. ४) सर्व विधाने बरोबर आहेत.

## २) केंद्रीय सेवा – सांविधानिक दर्जा व कार्ये

१) केंद्र शासनाच्या कर्मचारी निवड आयोगाची स्थापना ...... मध्ये करण्यात आली.

१) १९६७ २) १९७७ ३) १९५० ४) १९८०

२) जोड्या लावा.

| **अनुच्छेद** | **तरतूद** |
|---|---|
| a) ३०९ | i) केंद्रीय सेवेची भरती आणि सेवा शर्ती. |
| b) ३११ | ii) अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींचा हक्क |
| c) ३२३-अ | iii) अखिल भारतीय सेवा आणि केंद्रीय सेवेतील बडतर्फी व कामावरून कमी करणे. |
| d) ३३५ | iv) प्रशासकीय न्यायाधिकरणाची स्थापना. |

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| १) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| २) | (i) | (iii) | (iv) | (ii) |
| ३) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| ४) | (ii) | (iv) | (i) | (iii) |

३) **अयोग्य/चुकीची** जोडी ओळखा :

| **केंद्रीय सेवेचे नाव** | **पालक संस्था अथवा मंत्रालय** |
|---|---|
| १) भारतीय कॉस्ट अकौंटस सेवा | – वित्त मंत्रालय |
| २) भारतीय ऑडिट अँड अकौंटस सेवा | – वित्त मंत्रालय |
| ३) भारतीय कस्टम्स अँड सेंट्रल एक्साईज सेवा | – वित्त मंत्रालय |
| ४) भारतीय महसूल सेवा | – वित्त मंत्रालय |

४) पुढील दोन विधानांपैकी कोणते **योग्य** आहे?

a) केंद्रीय सेवेतील वर्ग I, II, III आणि IV हे वर्गीकरण गट A, B, C आणि D मध्ये दुसरा वेतनआयोग यांच्या शिफारशीवरून बदलण्यात आले.

b) स्वातंत्र्याअगोदर त्यांना I वर्ग, वर्ग II, गौण व दुय्यम संबोधिले जाईल.

**पर्यायी उत्तरे** :

१) केवळ (a) २) केवळ (b) ३) दोन्ही ४) एकही नाही

५) केंद्रीय सेवा या सेवाकरिता असतात :

a) ज्या सेवा केंद्र सरकार करिता काम करतात.

b) केंद्रीय सेवामध्ये राज्याच्या केडरचे कर्मचारी असतात.

c) राज्यामध्ये केंद्राकडून अधिकाऱ्याची नियुक्ती केली जाते पण ते केवळ केंद्रासाठी कार्य करतात.

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त (b) आणि (c) २) फक्त (a) आणि (b) ३) फक्त (a), (b) आणि (c) ४) फक्त (a) आणि (c) फक्त

६) संविधानाच्या प्रारंभी आंग्ल भारतीय समाजातील व्यक्तींच्या नियुक्त्या १५ ऑगस्ट १९४७ पूर्वीप्रमाणेच पुढीलपैकी कोणत्या विभागात केल्या जात होत्या ?

a) रेल्वे b) सीमाशुल्क c) आय कर d) डाक व तार

**पर्यायी उत्तरे** :

१) (a),(b) व (c) २) (b),(c) व (d) ३) (a),(b) व (d) ४) (a) (c) व (d)

७) ईस्ट इंडिया कंपनीच्या आरंभीच्या काळापासून खालीलपैकी कोणत्या सेवांचा दीर्घ इतिहास आहे ?

१) मुलकी आणि वैद्यकीय सेवा २) कृषी आणि व्यवसाय (व्यापार) सेवा

३) वन आणि अभियांत्रिकी सेवा ४) मुलकी आणि तांत्रिक सेवा

८) खालील कोणते विधान/विधाने **योग्य** आहे/त?

a) केंद्रीय आणि राज्य सेवांबाबत संविधानाच्या १४ व्या भागामध्ये कलम ३०८ ते ३१४ अंतर्गत तरतुदी केलेल्या आहेत.

b) कलम ३११ अंतर्गत सनदी सेवकांना त्यांच्या पदाच्या कार्यकालाबाबत संरक्षण देण्यात आले आहे.

**पर्यायी उत्तरे :**

१) केवळ (a)   २) केवळ (b)   ३) दोन्ही   ४) एकही नाही

९) सार्वजनिक सेवेच्या (public employment) अनुषंगाने भारतीय राज्य घटनेच्या तरतुदीनुसार खालीलपैकी कोणती विधाने **सत्य** आहेत ?

a) संसद कायदा करून सार्वजनिक नोकऱ्यांकरिता, एखाद्या राज्यात अथवा केंद्रशासित प्रदेशात वास्तव्य कालावधीची अट घालू शकते.

b) राज्य शासन त्यांचे राज्यातील सार्वजनिक सेवेतील नोकऱ्यांकरिता राज्यातील किमान रहिवासाची अट कायदा करून घालू शकते.

c) नागरिकांचे मागासवर्गीय गट, ज्यांना सार्वजनिक सेवेत पुरेसे प्रतिनिधित्व नाही, त्यांच्या पदोन्नतीकरिता आरक्षण ठेवता येते.

d) एखाद्या विशिष्ट वर्षातील भरावयाच्या एकूण जागांच्या कमाल ५० टक्के जागा आरक्षित करण्याच्या मर्यादेमध्ये त्यापूर्वीच्या वर्षात रिक्त राहिलेल्या आरक्षित जागाही विचारात घ्याव्या लागतात.

१) (a),(b)   २) (a), (d)   d) (a), (b), (c), (d)   ४) (a)

## ३) राज्य सेवा – सांविधानिक दर्जा व कार्ये

*१) राज्यातील परिवीक्षाधीन आय.ए.एस. ची नेमणूक यांच्याकडून ठरविली आहे.*

*a) एलबीएस राष्ट्रीय प्रशासन प्रबोधिनीचे संचालक   b) केंद्रीय कर्मचारी मंत्रालय*

*c) राज्याचे मुख्यमंत्री   d) राज्याचे मुख्य सचिव*

***पर्यायी उत्तरे :***

१) (a) आणि (d)   २) (b) आणि (c)   ३) फक्त (a)   ४) फक्त (d)

## सनदी सेवक व वेतन आयोग

१) खालीलपैकी कोणते विधान (ने) **योग्य** आहे/आहेत ?

a) सनदी सेवकाच्या विरुद्ध चौकशी प्रक्रिया संविधानाच्या कलम ३११ नुसार पूर्ण केली जाते.

b) कलम ३११ अंतर्गत सनदी सेवकांना मिळालेले संरक्षण खूपच अधिक आहे.

**पर्यायी उत्तरे :**

१) केवळ (a)   २) केवळ (b)   ३) दोन्ही   ४) वरीलपैकी एकही नाही

२) खालीलपैकी कोणी सनदी सेवकांच्या संघावर पूर्णपणे बंदी घालण्याची शिफारस केली ?

१) पहिला वेतन आयोग   २) तिसरा वेतन आयोग

३) गोरवाला अहवाल   ४) प्रशासकीय सुधारणा आयोग

३) जोपर्यंत नऊ वर्षाची सेवा पूर्ण होत नाही तोपर्यत भारतीय प्रशासकीय सेवेतील (आय. ए. एस.) अधिकाऱ्यास जिल्हाधिकारी म्हणून नियुक्त केले जाऊ नये, अशी शिफारस कोणी केली?

१) रॉयल आयोग   २) पाचवा केंद्रीय वेतन आयोग

३) पहिला प्रशासकीय सुधारणा आयोग   ४) दुसरा प्रशासकीय सुधारणा आयोग

४) महागाई भत्त्याबाबत खालील दोन विधाने विचारात घ्यावी.

a) केंद्र सरकारी कर्मचारी/निवृत्ती वेतनधारक यांना मिळणारा महागाई भत्ता दर वर्षी १ जुलै रोजी सुधारित होतो.

b) अखेरचा जाहीर झालेला वाढीव भत्ता १०% वाढला असून तो १.७.२०१३ पासून ९०% झाला आहे.

आता सांगा की :

१) (a) बरोबर (b) नाही    २) (b) बरोबर (a) नाही

३) (a) आणि (b) दोन्ही बरोबर    ४) (a) आणि (b) दोन्ही बरोबर नाही

५) भारतात सरकारी कर्मचाऱ्यांसाठी आचारसंहिता म्हणजे :

a) सेवेतील सचोटी    b) सेवेतील अनुशासन

c) सेवेत वेळेत कार्य करणे    d) सेवेत असताना राजकारणापासून तटस्थता

**पर्यायी उत्तरे :**

१) (a), (b), (c) विधाने योग्य आहेत.    २) (a), (c), (d) विधाने योग्य आहेत.

३) (a), (b), (d) विधाने योग्य आहेत.    ४) वरील सर्व विधाने योग्य आहेत.

## प्रशासकीय सुधार आयोग

१) जोड्या लावा.

| **समिती/आयोग** | **अध्यक्ष** |
|---|---|
| a) भा.प्र.से. अधिकाऱ्यांच्या सेवांतर्गत प्रशिक्षण मूल्यांकन | i) पी. सी. होटा |
| b) नागरी सेवा सुधारणा | ii) एम्.एम्. पूंछी |
| c) दुसरा प्रशासकीय सुधारणा आयोग | iii) युगंधर |
| d) केंद्र-राज्य संबंधाबाबत दुसरा आयोग | iv) विरप्पा मोईली |

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| १) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| २) | (iv) | (i) | (iii) | (ii) |
| ३) | (iii) | (i) | (iv) | (ii) |
| ४) | (iii) | (ii) | (iv) | (i) |

२) खालील अहवाल लक्षात घेऊन कालक्रमानुसार त्यांचा योग्य क्रम लिहा.

a) पॉल एच. ॲपलबी अहवाल-I

b) ए. डी. गोरवाला अहवाल

c) संथानम समिती अहवाल

d) प्रशासकीय सुधारणा आयोग अहवाल

**पर्यायी उत्तरे :**

१) (b), (a), (d), (c)    २) (b), (a), (c), (d)    ३) (a), (b), (c), (d)    ४) (a), (b), (d), (c)

३) दुसऱ्या प्रशासकीय सुधार आयोगाची शिफारस काय आहे?

१) आपत्ती व्यवस्थापन ही संघशासनाची प्राथमिक जबाबदारी असावी आणि राज्यशासनाने सहयोगाची भूमिका पार पाडावी.

२) आपत्ती व्यवस्थापन ही राज्य शासनाची प्राथमिक जबाबदारी असावी आणि संघशासनाने सहयोगाची भूमिका पार पाडावी.

३) आपत्ती व्यवस्थापन ही राज्य व संघशासन दोघांचीही प्राथमिक जबाबदारी असावी.

४) आपत्ती व्यवस्थापन ही संघशासनाची प्राथमिक जबाबदारी असावी आणि जिल्हा प्रशासनाने सहयोगाची भूमिका पार पाडावी.

४) दुसऱ्या प्रशासकीय सुधारणा आयोगाने अशी शिफारस केलेली आहे, की नगर पंचायती वगळता शहरी स्थानिक शासनात त्रिस्तरीय प्रशासन असावे. ते आहेत.

## १) निर्मिती, अंमलबजावणी, मूल्यमापन आणि विश्लेषण

## २) सार्वजनिक धोरण आणि जागतिकीकरण

## ३) भारतातील सार्वजनिक धोरण प्रक्रिया

## ४) समाजकल्याण – महिला, बालक, कामगार व युवक

१) केंद्र सरकारकडून सामाजिक विकासाच्या क्षेत्रात यश संपादन करणाऱ्या व्यक्तिगत महिलांना स्त्रीशक्ती पुरस्कार प्रदान करण्यात येतो. खाली नमूद केलेल्या सहा सुप्रसिद्ध स्त्री व्यक्तिमत्त्वांच्या नावे हा पुरस्कार अदा करण्यात येतो.

a) देवी अहिल्याबाई होळकर　　b) कन्नगी　　c) माता जिजाबाई

d) राणी गैदिनलियो जेलियांग　　e) राणी लक्ष्मीबाई　　f) राणी रुद्रम्मा देवी

सन २००७ मध्ये वरीलपैकी कोणता पुरस्कार अत्युत्कृष्ट प्रशासकीय कौशल्य, दर्जेदार नेतृत्व, आणि धैर्य यासाठी समाविष्ट करण्यात आला.

१) (b)　　२) (d)　　३) (f)　　४) वरीलपैकी नाही

२) महाराष्ट्रातील कामगार चळवळींची पीछेहाट होण्याची कारणे कोणती?

अ) कामगारांचे दारिद्र्य　　ब) कामगार संघटना मधील स्पर्धा

क) उद्योगपतींचे प्रतिकूल धोरण　　ड) शासनाचे चळवळीवरील नियंत्रण

वरीलपैकी कोणते विधान बरोबर आहे?

१) अ फक्त　　२) अ आणि ब फक्त　　३) अ, ब आणि क　　४) अ, ब आणि ड

३) योग्य कथन ओळखा :

a) जुलै, २००२ मध्ये राष्ट्रीय मच्छीमार संघटनेद्वारे (NEF) परकीय ट्रॉलर्सला सरकारने दिलेल्या परवान्याच्या निर्णयाला विरोध करण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर संप करण्याचे आव्हान करण्यात आले.

b) आंध्र प्रदेशाच्या दुर्गम खेड्यातील ग्रामीण महिलांनी मद्यविरोधी, माफिया विरोधी, सरकार विरोधी केलेल्या संघर्षाला अर्क–विरोधी आंदोलन म्हटले गेले.

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त (a)　　२) फक्त (b)

३) (a) आणि (b) दोन्ही　　४) (a) आणि (b) दोन्हीही नाही

४) जोड्या लावा. (तिथी भोजन – मध्यान्ह भोजन योजना)

| 'अ' | 'ब' |
|---|---|
| a) संप्रति भोजन | i) राजस्थान |
| b) अन्न धान्य | ii) पंजाब |
| c) उत्सव भोज | iii) आसाम |
| d) प्रीती भोज | iv) पुदुच्चेरी |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| १) | (ii) | (iii) | (iv) | (i) |
| २) | (iii) | (iv) | (i) | (ii) |
| ३) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| ४) | (iii) | (ii) | (i) | (iv) |

## ५) अशासकीय संघटना व समाजकल्याणामधील भूमिका

१) पुढील विधाने वाचा.

a) भारतीय महिला राष्ट्रीय फेडरेशन (NFIW) ही संघटना भारतीय साम्यवादी मार्क्सवादी पक्षाशी संबंधित आहे.

b) अखिल भारतीय लोकशाही महिला संघटना (AIDWA) ही संघटना भारतीय साम्यवादी पक्षाशी संबंधित आहे.

**योग्य** पर्याय निवडा.

१) (a), (b), दोन्ही विधाने योग्य आहेत. २) (a) विधान योग्य आहे.

३) (b) विधान योग्य आहे. ४) (a), (b) दोन्ही अयोग्य आहेत.

२) खालील विधानांचा विचार करा :

आरक्षण योजना स्वयंसेवी संस्थांना लागू केली जात आहे ज्यांना

a) भारताच्या कन्सॉलिडेटेड फंडमधून रु. २ लाखापेक्षा अधिक ग्रांट मिळते.

b) ज्या १० पेक्षा अधिक इसमांना नियमितपणे रोजगार देतात.

c) किमान ५०% आवर्ती खर्च हा केंद्र शासनाच्या ग्रांट इन एड मधून होतो.

वरीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत ?

१) (a) आणि (b) २) (b) आणि (c) ३) (a) आणि (c) ४) (a),(b) आणि (c)


## THIS SAMPLE IS OVER

To buy complete MPSC Mains GS II course click on the link below -
https://www.studycircleonline.com/notes/GSII-Admin-Policies/155
To buy complete MPSC Mains course incusive of the complete syllabus click on the link below-
https://www.studycircleonline.com/courses/mpsc-mains-20-21-complete-course-/13
or visit www.studycircleonline.com